दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ४५ । मंगळवार २४ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

अज्ञात कारच्या धडकेत सायकलस्वाराचा मृत्यू

राहुरी : अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून, राहुरी एमआयडीसी परिसरात अज्ञात कारच्या धडकेत रामदास शंकर शिंदे या वयोवृद्ध सायकलस्वाराचा मृत्यू झाला. रविवार (दि. २२) रात्री राहुरी फॅक्टरी येथील सूतगिरणीजवळ हा अपघात घडला.

रामदास शिंदे हे सायकलवरून राहुरी फॅक्टरीकडून राहुरीकडे जात असताना अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले. रस्त्याने जाणाऱ्या वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा स्नेहल दिवे यांनी घटनास्थळी मदतकार्य केले. रुग्णवाहिका चालक पप्पू कांबळे यांनी त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले.

या महामार्गावरील अपूर्ण कामे, रस्त्याची दुरवस्था, ठिकठिकाणी खोदकाम आणि वाहतूक नियंत्रणाचा अभाव यामुळे वारंवार अपघात होत आहेत. प्रशासनाने अपघात रोखण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात. आणखी किती निष्पाप नागरिकांचे बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार, असा संतप्त सवाल स्नेहल दिवे यांनी उपस्थित केला.

रावसाहेब खेवरे यांच्यावर बलात्काराचा गुन्हा!

'नाना'च्या नावाभोवतीचे गूढ उलगडले...

■ १५ वर्षांच्या शोषणाच्या आरोपाची पोलिसांकडून गंभीर दखल
■ डॉ. संजय म्हस्के व डॉ. अनंत शेकोकर यांचाही आरोपींमध्ये समावेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राष्ट्र सह्याद्री इफेक्ट!

श्रीरामपूर : दैनिक राष्ट्र सह्याद्रीने 'मी आमदार होणार... तुझे भले करतो!' असे आमिष दाखवून 'नाना'ने १५ वर्षे शारीरिक शोषण केल्याच्या महिलेच्या गंभीर आरोपांना वाचा फोडताच श्रीराम पूरसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. या वृत्ताची पोलीस प्रशासनाने तातडीने दखल घेत पीडित महिलेचा शोध घेतला, तिचा जबाब नोंदवला आणि अखेर तिच्या फिर्यादीवरून शिवसेना नेते रावसाहेब खेवरे यांच्यासह डॉ. संजय म्हस्के, डॉ. अनंत शेकोकर व अन्य संबंधितांविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्तानंतर पोलिसांनी केलेल्या या कारवाईने परिसरात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्र सह्याद्रीच्या पहिल्याच पानावर वृत्त प्रसिद्ध होताच राजकीय वर्तुळापासून गावोगावच्या कट्ट्यांपर्यंत एकच चर्चा सुरू झाली. 'हा नाना नेमका कोण?', 'श्रीरामपूरचा की जिल्ह्यातला?' असे प्रश्न उपस्थित होत तर्कवितर्कांना उधाण आले. नाना नावाच्या अनेक व्यक्तींची नावे चर्चेत येऊ लागली. काहींनी तर थेट दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले यांच्याशी संपर्क साधून वृत्ताची खातरजमा करण्याचाही प्रयत्न केला.

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, रावसाहेब खेवरे यांनी राजकीय प्रभाव आणि भविष्यात आमदार होणार असल्याचे सांगत म हिलेला लग्नाचे व तिचे भले करण्याचे आश्वासन दिले. या आमिषातून तब्बल १२ ते १५ वर्षे वेळोवेळी शारीरिक शोषण केल्याचा आरोप महिलेने केला आहे. अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांतील विविध ठिकाणी अत्याचार केल्याचे, गर्भनिरोधक गोळ्या घेण्यास भाग पाडल्याचे तसेच सात ते आठ वेळा गर्भपात केल्याचे गंभीर आरोपही फिर्यादीत करण्यात आले आहेत.

या प्रकरणात संबंधित डॉक्टरांनी मदत केल्याचा आरोपही महिलेने केला असून, त्यानुसार डॉ. संजय म्हस्के आणि डॉ. अनंत शेकोकर यांच्यासह अन्य संबंधितांची नावे गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आली आहेत.

बातमीची दखल, पोलिसांची कारवाई!

राष्ट्र सह्याद्रीने या प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर पोलिसांनी महिलेपर्यंत पोहोचून तिचे म्हणणे ऐकून घेतले. आवश्यक पडताळणीनंतर तिच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे या गंभीर प्रकरणाला आता कायदेशीर वळण मिळाले असून, पुढील पोलीस तपासाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणाने सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारितेचा प्रभाव पुन्हा अधोरेखित झाला!

अहिल्यानगरमध्ये विजेचा शॉक लागून दोघांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

दोन वेगवेगळ्या घटना

अहिल्यानगर : शहर परिसरात सोमवारी विजेचा शॉक लागून घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोघांचा मृत्यू झाला. बोल्हेगाव येथे इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर फ्लेक्स बोर्ड लावताना उच्च दाबाच्या वीजवाहिनीचा स्पर्श झाल्याने तरुणाचा मृत्यू झाला. तर एमआयडीसी परिसरात डंपर मागे घेत असताना विजेचा शॉक लागून चालकाचा मृत्यू झाला. या घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पहिली घटना बोल्हेगाव येथील कातोरे वस्ती परिसरात घडली. प्रसाद रतिलाल भंडारी (वय ३४, रा. वृंदावन कॉलनी, कातोरे वस्ती, बोल्हेगाव) हा फ्लेक्स बोर्ड लावण्याचे काम करत होता. एका कंपनीने त्याला नेवासा फाटा येथे काम दिले होते. तो साथीदारांसह इमारतीच्या टेरेसवर फ्लेक्स लावत असताना वाऱ्यामुळे फ्लेक्सचा स्पर्श जवळून गेलेल्या उच्च दाबाच्या वीजवाहिनीला झाला. त्यामुळे प्रसादला विजेचा जोरदार धक्का बसून तो खाली कोसळला. सहकाऱ्यांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. रात्री उशिरा नगरच्या अमरधाम येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दुसरी घटना एमआयडीसी परिसरातील शासकीय दूध डेअरी चौकात घडली. रघुनाथ शंकर सपकाळ (वय ५०, रा. शिंगवे नाईक, ता. अहिल्यानगर) हे स्वतःच्या ताब्यातील डंपर मागे घेत असताना त्यांना विजेचा धक्का बसला. या घटनेत ते गंभीर भाजले. त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शिर्डीत तरुणाचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शहरातील साई आश्रमाजवळील एका दुकानाच्या गाळ्यात सिद्धार्थ शिवरुद्र मोरगे हा तरुण बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी (दि. २३) सायंकाळी साडेआठच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, साई आश्रमाजवळील संबंधित दुकानाचा गाळा कोपरगाव येथील अनुप कातकडे यांच्या मालकीचा असल्याचे समजते. याच गाळ्यात सिद्धार्थ मोरगे बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच त्याला तातडीने साईबाबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी उपचारासाठी प्रयत्न केले; मात्र त्याचा जीव वाचू शकला नाही.दरम्यान, सिद्धार्थ याचा मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. हा आत्महत्येचा प्रकार आहे की यामागे अन्य काही कारण आहे, याबाबत परिसरात चर्चा सुरू आहे. मात्र, मृत्यूचे कारण पोलिस तपास आणि अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे शिर्डी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दुकानात आढळला बेशुद्ध

भरधाव कंटेनरखाली दुचाकीवरील पती-पत्नी चिरडले

मुलाची भेट घेऊन परतताना काळाचा घाला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : मुलाची भेट घेऊन दुचाकीवरून गावी परतणाऱ्या पती-पत्नीला भरधाव कंटेनरने चिरडल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. वैजापूर-गंगापूर रस्त्यावरील गंगापूर चौफुलीजवळ सोमवारी (दि. २३) सायंकाळी सात वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. पुंडलिक कचरू रोकडे (वय ६५) आणि पार्वताबाई पुंडलिक रोकडे (वय ६०, रा. रहाडी, ता. येवला, जि. नाशिक) अशी मृत पती-पत्नीची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पुंडलिक रोकडे आणि त्यांच्या पत्नी पार्वताबाई सोमवारी सकाळी मुलाची भेट घेण्यासाठी गेले होते. मुलाची भेट घेतल्यानंतर दोघेही दुचाकीवरून आपल्या रहाडी या गावी परतत होते. सायंकाळी सातच्या सुमारास ते वैजापूर-गंगापूर मार्गावरील गंगापूर चौफुलीजवळ आले असता समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही कंटेनरखाली सापडून चिरडले गेले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघात घडताच कंटेनरचालकाने वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने पाठलाग सुरू केला. अखेर जांबरगाव येथील समृद्धी महामार्गाच्या इंटरचेंजजवळ पोलिसांनी कंटेनर पकडला. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पोलिसांकडून पुढील तपास व कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.





पंचगंगा साखर कारखान्यासमोर शेतकऱ्यांचा चार तास रास्ता रोको



ऊसाला ३ हजार ९०० रुपये भाव देण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : उसाला योग्य भाव मिळावा, पहिली उचल वाढवावी आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या उसाच्या तोडीला प्राधान्य द्यावे, या मागण्यांसाठी वैजापूर-गंगापूर रस्त्यावरील भगूर फाटा परिसरातील महालगाव येथील पंचगंगा साखर कारखान्यासमोर सोमवारी (दि. २३) शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. हिंदवी जनक्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष अजय पाटील साळुंके यांच्या नेतृत्वाखाली तसेच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब जानराव यांच्या पुढाकाराने सकाळी १० वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. विविध शेतकरी संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. सुमारे चार तास चाललेल्या या आंदोलनामुळे रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

आंदोलकांनी पंचगंगा साखर कारखान्याने कोल्हापूरच्या धर्तीवर उसाला प्रतिटन ३ हजार ९०० रुपये भाव द्यावा, अशी प्रमुख मागणी केली.

तसेच छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कोल्हापूरप्रमाणे प्रतिटन ४ हजार २०० रुपये भाव मिळावा, अशी मागणीही करण्यात आली. उसाची पहिली उचल प्रतिटन ३ हजार ६०० रुपये देऊन उर्वरित ३०० रुपये नंतर द्यावेत, अशी भूमिका शेतकऱ्यांनी मांडली.ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी आणि बोअरवेलमधील पाणी संपले आहे, अशा शेतकऱ्यांच्या उसाची तातडीने तोड करून कारखान्याने ऊस घेऊन जावा, अशी मागणी करण्यात आली. वैजापूर तालुक्यातील कारखान्याचे २५ किलोमीटरचे कार्यक्षेत्र निश्चित करून या परिसरातील उसाला तोडणीमध्ये प्राधान्य द्यावे, साखरेचा दर वाढल्यास ७०:३० च्या नियम नुसार शेतकऱ्यांना वाढीव रक्कम द्यावी, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी कारखाना प्रशासनाने अरेरावीची भाषा वापरू नये, अशा मागण्याही आंदोलकांनी केल्या.





दुष्काळाने तालुका होरपळला; ३३ गावांना टँकरचा आधार!

अधिकाऱ्यांची वाड्या-वस्त्यांवर धाव ! वाढत्या लोकसंख्येमुळे वाढीव टँकरची गरज ऐरणीवर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : दुष्काळाच्या झळांनी नगर तालुका अक्षरशः होरपळून निघत आहे. शेतशिवारातील पिके हातची गेल्यानंतर आता गावोगावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांच्या चाऱ्याची टंचाई आणि दुसरीकडे पाण्यासाठी सुरू असलेली नागरिकांची वणवण अशा दुहेरी संकटात ग्रामीण भाग सापडला आहे. सध्या तालुक्यातील तब्बल ३३ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून नागरिकांची तहान भागविण्यासाठी प्रशासनाची गावोगावी धावपळ सुरू आहे.

तालुक्यातील अनेक गावांमधील विहिरी, कूपनलिका आणि पाण्याचे स्रोत आटले आहेत. भूजलपातळी कमालीची खालावल्याने पिण्याच्या पाण्यासाठी दुसरा पर्याय उरलेला नाही. त्यामुळे टँकरच्या पाण्यावरच अनेक गावांचा दैनंदिन व्यवहार अवलंबून आहे. गावापासून दूर असलेल्या वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांना पाणी मिळावे यासाठी प्रशासनाकडून विशेष नियोजन केले जात आहे. यासाठी प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचारी प्रत्यक्ष वाड्या-वस्त्यांवर जाऊन पाण्याची परिस्थिती, रस्त्यांची उपलब्धता आणि टँकरच्या खेपांचे नियोजन करत आहेत.

आ. कर्डिले यांच्याकडून प्रशासनाला सूचना !

गावोगावी टँकरने सुरू असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत आ. अक्षय कर्डिले यांनी दुष्काळात पाण्याचे योग्य नियोजन करून नागरिकांचे हाल होणार नाहीत. याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



जेऊर गावातही पाणीटंचाईची तीव्रता वाढत आहे. गावचे प्रशासक सारंग दुगम आणि ग्रामपंचायत अधिकारी भागुजी मेहत्रे प्रत्यक्ष वाड्या-वस्त्यांवर जाऊन पाणीपुरवठ्याची परिस्थिती जाणून घेत आहेत. टँकर पोहोचण्यास अडचण येणाऱ्या ठिकाणांची माहिती घेऊन खेपांचे नियोजन केले जात आहे. कोणतीही वस्ती पाण्यापासून वंचित राहू नये आणि नागरिकांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबावी यासाठी ग्रामपंचायत स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

पाणीपुरवठ्याचे नियोजन २०११ च्या जनगणनेतील लोकसंख्येच्या आधारे होत असल्याने सध्याची वाढलेली लोकसंख्या आणि विस्तारलेल्या वाड्या-वस्त्यांच्या तुलनेत टँकरच्या खेपा अपुऱ्या पडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे काही गावांना मंजूर खेपांमध्येच पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना मोठी कसरत करावी लागत आहे. परिणामी अनेक गावांकडून वाढीव टँकरची मागणी होण्याची शक्यता आहे. तर काही ठिकाणी नव्याने टँकर सुरू करण्यासाठी प्रस्ताव दाखल होण्याची चिन्हे आहेत.

एकीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत असताना दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचे संकट दिवसेंदिवस गडद होत आहे. आगामी काळात पाणीटंचाई आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याने प्रशासनासमोर टँकरच्या खेपा वाढविणे, नव्या गावांचे प्रस्ताव मंजूर करणे आणि प्रत्येक वाडी-वस्तीपर्यंत नियमित पाणी पोहोचविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

जेऊरला वाढीव टँकरची गरज
तीन खेपा अपुऱ्या पडण्याची शक्यता !

जेऊर गावासाठी सध्या टँकरच्या तीन खेपा मंजूर आहेत. मात्र गावाची लोकसंख्या, विस्तारणाऱ्या वाड्या-वस्त्या आणि वाढती पाणीटंचाई लक्षात घेता या तीन खेपांमध्ये सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध करून देताना ग्रामपंचायतीला मोठी कसरत करावी लागत आहे. सध्याची परिस्थिती पाहता लवकरच जेऊर गावासाठी वाढीव टँकरच्या खेपा किंवा अतिरिक्त टँकर सुरू करण्याची गरज निर्माण होण्याची शक्यता आहे.

द•ख•ल

देवीभोयरेच्या बसस्थानकाचा प्रश्न मार्गी : उपसरपंच सावंत

निघोज : गावातील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी प्रशस्त बसस्थानक उभारण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. या मागणीसाठी देवीभोयरे गावचे मा. उपसरपंच विकास सावंत व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या प्रयत्नांना यश आले असून, पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी अवघ्या एका वर्षाच्या आत दिलेला शब्द पूर्ण केला आहे.देवीभोयरे गावच्या अंबिका देवस्थानला 'ब' वर्ग दर्जा मिळवून देण्याबरोबरच बसस्थानकासाठी आवश्यक निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी देवीभोयरे गावचे माजी उपसरपंच विकास सावंत यांच्यासह ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मंत्रालयात जाऊन आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेतली होती. त्यावेळी आमदार दाते यांनी शिष्टमंडळाला बसस्थानकाचा प्रश्न मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. तो शब्द त्यांनी एका वर्षाच्या आत पूर्ण करून दाखविला आहे. गावातील वाढती लोकसंख्या, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता प्रशस्त बसस्थानकाची आवश्यकता होती. आता या निर्णयामुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी दिलेला शब्द पाळून देवीभोयरे गावाचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल महायुतीचे सर्व नेते, कार्यकर्ते आणि समस्त ग्रामस्थांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहे.



कर्जतमध्ये शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांचा स्नेहमेळावा



कर्जत : कर्जत येथे आज शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य सचिव मा. राम रेपाळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांचा स्नेहमेळावा तसेच संघटनात्मक बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या मेळाव्याच्या माध्यमातून पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, पक्षवाढीसाठी नियोजन करणे आणि शिवसैनिकांमध्ये एकजूट निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य सचिव राम रेपाळे साहेब तसेच जिल्हाध्यक्ष मा. बाबूशेठ टायरवाले यांनी उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. पक्षाची ध्येयधोरणे, संघटनात्मक कार्यपद्धती, जनतेच्या प्रश्नांवर काम करण्याची दिशा आणि आगामी काळातील पक्षविस्तार यासंदर्भात विचारविनिमय करण्यात आला. या प्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक माजी सुनील शिंदे, अहिल्यानगर दक्षिण महिला जिल्हाप्रमुख डॉ. शबनम इनामदार, महाराष्ट्र राज्य कामगार सेना कार्याध्यक्ष संतोष राजपूत, कामगार सेना जिल्हाप्रमुख अंबादास तात्या जाधव, शिवसेना कर्जत तालुका नेते प्रवीण दादा घुले पाटील, जिल्हा उपप्रमुख बापूसाहेब नेटके, मेजर तालुकाप्रमुख डॉ. नितीन तोरडमल, कर्जत जिल्हा उपप्रमुख चंदनसिंग परदेशी, प्रसाद कानगुडे, महेश उकिरडे, पप्पू मासाळ, माऊली .थोरात यांच्यासह शिवसेनेचे विविध पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बंद आय क्लिनिकचे कुलूप तोडून २२ हजाराचा मुद्देमाल लंपास

अहिल्यानगर : शहरातील बाळासाहेब देशपांडे रुग्णालयासमोरील मदनचंद्र आर्केड इमारतीत ही घरफोडीची घटना घडली आहे. या इमारतीतील बंद असलेल्या डॉ. किंनगावकर आय क्लिनिकचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. चोरट्याने क्लिनिकमधील विविध साहित्य चोरून नेल्याची घटना २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी अविनाश लक्ष्मीकांत किंनगावकर (वय ४३, रा. अगरकरमळा, स्विटकॉर्नर जवळ, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे वडील दिवंगत डॉ. लक्ष्मीकांत हे नेत्ररोगतज्ज्ञ होते आणि २०२४ मध्ये त्यांचे निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर हे आय क्लिनिक बंद होते, मात्र फिर्यादी अधूनमधून तेथे जात असत.

शेवगाव तालुक्यातील ५४ ग्रामपंचायतीचा कारभार वर्षाभरापासून प्रशासकाच्या हाती?

विकास कामावर परिणाम। निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

हातगाव : शेवगाव तालुक्यातील ९४ ग्रामपंचायतीपैकी ४८ ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांची मुदत १० फेब्रुवारी २६ रोजी संपली असून या व्यतिरिक्त इतरही ६ ग्रामपंचातीचीही मुदत संपून २ वर्ष पूर्ण होत आली असून सुद्धा आता या ५४ ग्रामपंचायतीच्या निवडणुका कधी होतील या बाबत मात्र शेवगाव तालुक्यात कायम चर्चा होताना ऐकावयास मिळत आहे.सध्या या सर्वच्या सर्व ५४ ग्रामपंचायतीवर शासनाने प्रशासक नेमले असून गाव पातळीवरचा सर्व कारभार प्रशासकार्फतच सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यातील ढोरजळगाव - शे, वरखेड, बेलगाव, तळणी, चेडेचांदगाव, अंतरवली खुर्द, अंतरवली बुद्रुक, अधोडी, सोनवहिर, कोळगाव, सुकळी, घोटन, भातकुडगाव, भाविनिमगाव, लखमापूरी, शेकटे बुद्रुक, मजलेशहर, निंबेनादूर, बक्तरपूर, ठाकूर पिंपळगाव, ठाकूर निमगाव, पिंगेवाडी, खुंटेफळ, बोडखे, दादेगाव, सोनेसांगवी, आव्हाने खुर्द, चापडगाव, हातगाव, कांबी, कोनोशी, शिंगोरी, हसनापूर, गायकवाड जळगाव, वाडगाव, सुलतानपूर बुद्रुक, राणेगाव, ढोरजळगाव - ने, आखातवाडे, माळेगांव, नजीक बाभुळगाव, दहिफळ जुने, दहिफळ नवीन, दहीगाव - शे, गादेवाडी, ताजनापूर, राक्षी व नागलवाडी या ४८ ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांची १० फेब्रुवारी २६ रोजी मुदत संपली असून खामपिंपरी जूनी व नवीन, मंगरुळ खुर्द व बुद्रुक आणि माळेगांव व सालवडगाव या ६ ग्रामपंचायतींच्याही पदाधिकाऱ्यांच्या मुदती २४ मध्येच संपल्या असून ४८ अधिक ६ अशा तालुक्यातील एकूण ५४ ग्रामपंचायतीमध्ये मुदती संपल्यापासून प्रशासनाने तालुका पातळीवरील अनेक अधिकाऱ्यांच्या प्रशासक म्हणून नियुक्त्या केलेल्या असल्यामुळे ते आणि संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक असे दोघेचजण ग्रामपंचायतीचा कारभार पहात असून या त्यांच्या कारभारामुळे गावात पदाधिकारी असताना जी मासिक मीटिंग घेऊन विकासाची कामे हाती घेतली जात होती त्या कामाला खीळ बसली असल्यामुळे अनेक गावांतील विकासाची कामेही थांबले असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान तालुक्यातील या सर्वच्या सर्व पहिल्या टप्प्यातील ५४ ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू करून प्रभाग रचना तयार करून प्रभाग वाईज प्रत्येक गावातील मतदानाच्या याद्याही तयार करण्याचे आदेश देऊन याद्याही तयार करण्याचे काम सुरू केले होते.मात्र त्या वेळी निवडणुकांच्या तारखा निश्चित होण्याआधीच त्या प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली असल्याने या निवडणुका लांबणीवर पडत चाललेल्या असल्याचेही चित्र दिसून येत आहे.

श्रीगोंद्याच्या माऊली हिरवेंना राष्ट्रवादीकडून जिल्ह्याची धुरा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंद्याच्या राजकीय वर्तुळात महत्त्वाची घडामोड घडली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) ओबीसी विभागाच्या दक्षिण अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी दत्तात्रय ऊर्फ माऊली सखाराम हिरवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी नियुक्तीपत्र देत हिरवे यांच्या खांद्यावर जिल्ह्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

ओबीसी समाजाच्या संघटनात्मक बांधणीसह शोषित, पीडित आणि वंचित घटकांचे प्रश्न आक्रमकपणे मांडण्याचे आव्हान आता हिरवे यांच्यासमोर असणार आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेण्याची अपेक्षाही नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

श्रीगोंद्यातील कार्यकर्त्याला थेट जिल्हास्तरावर नेतृत्वाची संधी मिळाल्याने तालुक्याच्या राजकीय वर्तुळात या नियुक्तीची चर्चा सुरू झाली आहे. आगामी काळात ओबीसी समाजाचे संघटन, पक्षवाढ आणि सामाजिक प्रश्नांवर हिरवे कोणती भूमिका घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर माऊली हिरवे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या दक्षिण अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

पैठण - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील शेवगाव हद्दीतील मार्गाचे काम कधी पूर्ण होणार?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

हातगाव : पैठण व पंढरपूर या दोन्ही तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या जवळपास २५० की मी च्या वर अंतर असणाऱ्या महामार्गास सण १७/१८ साली तत्कालीन व सध्याचे केंद्रीय रस्ते व दळण- वळण मंत्री ना.नितीन गडकरी यांनी मंजुरी दिली असून या महामार्गाचे शेवगाव हद्दीसह पैठण हद्दीतीलही काही काम अजूनपर्यंत पूर्ण झाले नसून हे काम कधी पूर्ण होणार अशी चर्चा महामार्गावरील अनेक गावातील नागरिकांमध्ये होताना ऐकावयास मिळत आहे.संभाजीनगर,अहिल्यानगर व सोलापूर या तीन जिल्ह्याच्या सरहद्दीतून जाणारा श्री क्षेत्र पैठण येथील संत एकनाथ महाराज यांचा प्रत्येक वर्षी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या व दोन्ही तीर्थ क्षेत्रांना जोडणाऱ्या या पाई पालखी मार्गास सन १७ /१८ साली ७५२ इ या क्रमांकाने मंजुरी मिळाली असून सदर मार्ग मंजूर होताच या मार्गाचे काम सुरू झाले असून त्यास जवळपास ८ ते ९ वर्षाचा कालावधी उलटत आला असताना सुद्धा हे काम अजूनही पूर्ण होत नसल्याने आता हे काम पूर्ण होईल की नाही अशी चर्चा या महामार्गावरील शेवगाव तालुक्यातील शेकटे, गोळेगाव,लाडजळगाव,बोधेगाव ,हातगाव व मुंगी गावासह पैठण तालुक्यातील दादेगाव जहागीर व पाटेगाव येथील नागरिकांतून होताना ऐकावयास मिळत आहे.या बाबत समजलेल्या माहितीनुसार शेवगावसह पैठण हद्दीत काम करणाऱ्या ठेकेदारास



मुदतीत काम करण्याचे जे आदेश दिले होते ते काम वेळेत न झाल्यामुळे ते करण्याकरिता पुन्हा ठेकेदारास मुदतवाढ दिली होती मात्र ते काम मुदत देऊनही पूर्ण झाले नसल्याने या संदर्भात संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात एका व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेची न्यायालयाने दखल घेत परतही काम करण्यासाठी संधी देत आता हे काम ३१ मार्च २६ अखेर पर्यंतच पूर्ण करण्यात यावे व पुन्हा मुदतवाढ देण्यात येणार नाही असे निर्देश न्यायालयाने दिले होते. तरी सुद्धा ते राहिलेले अपूर्ण काम संबंधित ठेकेदाराकडून पूर्ण झाले नसून आजमितीस या अपूर्ण असणाऱ्या कामाची सततच्या व वाढत्या वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली असून दररोजच्या धुळीने अनेक नागरिक त्रस्त असून नाराजीचा सूर दिसून येत आहे तर अनेक नागरिक धुळीच्या साम्राज्यामुळे आजारी पडत असल्याचेही चित्र दिसून आहे.

'गरिबांची दिवाळी' उपक्रमांतर्गत गरजू कुटुंबांना शिधावाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'गरिबांची दिवाळी' या सामाजिक उपक्रमांतर्गत पारनेर तालुक्यातील जवळा येथे गरीब व गरजू कुटुंबांना नुकतेच शिधावाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते लाभार्थ्यांना शिधा वितरित करण्यात आला. बाजार समीतीचे माजी सभापती किसनराव रासकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना सुजित झावरे पाटील म्हणाले की, मा. एकनाथ शिंदे साहेब यांनी समाजातील गरीब, कष्टकरी आणि गरजू कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या उदात्त भावनेतून 'गरिबांची दिवाळी' हा उपक्रम हाती घेतला आहे. दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण असून, या सणाच्या निमित्ताने गरजू कुटुंबांच्या घरातही आनंदाचा



प्रकाश पोहोचावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली जात आहे. या उपक्रमाची संकल्पना राबविल्याबद्दल त्यांनी एकनाथ शिंदे साहेबांचे आभार मानले. यावेळी खंडूजी भुकन, आनंदराव सालके, चेअरमन नाथा शेठ रासकर, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख गजाननराव सोमवंशी रामदास गाडीलकर, अमोल रासकर, अजित पठारे, प्रदीप काका सोमवंशी , गोरख सालके पाटील, गणेश सालके बाबाजी शेठ लोखंडे, बाळासाहेब सालके, अशोकराव कोठावळे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमामुळे जवळा गावातील गरजू कुटुंबांच्या दिवाळीच्या आनंदात भर पडली. माजी सभापती व जवळा गावचे सर्वेसर्वा किसनराव रासकर यावेळी म्हणाले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून राज्यातील लाखो गरजूंना दिवाळीचा आनंद साजरा करता आला आहे. शिवसेनेचे नेते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील हजारो कुटुंबांना दिवाळीचे किट मिळाले असून झावरे पाटील हे सर्वसामान्य जनतेचे खऱ्या अर्थाने कैवारी असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून तालुका विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून झावरे पाटील यांनी तालुक्यातील गावांचा विकासाभिमुख कायापालट केला.

अध्यापन कौशल्यामध्ये अधिक अचूकता येण्यासाठी प्रशिक्षण शिबीर उपयुक्त : कराड

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : शिक्षकांना वेळोवेळी व प्रसंगानुरूप दिले जाणारे प्रशिक्षण म्हणजे केवळ प्रमाणपत्र मिळवण्याचे साधन नसून अध्यापन कौशल्यामध्ये अधिक भर घालून त्याचा वापर गुणवत्ता वाढीसाठी व्हावा, असा शासनाचा हेतू असल्याची माहिती शालेय पोषण आहार विभागाचे तालुका प्रमुख रामनाथ कराड यांनी दिली.

श्री तीलोक जैन विद्यालयामध्ये शिक्षकांच्या ज्ञानवृद्धी व व्यावसायिक क्षमता विकासावर भर देण्याच्या हेतूने वरिष्ठ वेतन व निवड श्रेणी प्रशिक्षण शिबिराचे दहा दिवसांसाठी आयोजन करण्यात आले.

समारोप कार्यक्रमाच्या प्रसंगी प्राचार्य डॉ.अजय भंडारी, विषय तज्ञ भास्कर बारगजे, आजीनाथ खेडकर, केंद्रप्रमुख बंडू नागरगोजे, सविता कुटे , नागनाथ हलकंबे, उप प्राचार्य भारत गाडेकर, आदी उपस्थित होते.

दहा दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी संदर्भातील नियम, शासन निर्णय, सेवाशर्ती, शिक्षकांचे कर्तव्य, शैक्षणिक जबाबदाऱ्या, विविध प्रशासकीय व शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञ मार्गदर्शकाच्या व्याख्यानांमुळे शिक्षकांच्या ज्ञानात भर पडण्या बरोबरच प्रशिक्षणाच्या सहभागातून अनुभवांची देवाण-घेवाण घडली. यावेळी प्राचार्य भंडारी, सुलभक प्रशिक्षणार्थी अर्जुन शिरसाट, संतोष अकोलकर, कवी



डॉ.कैलास दौंड, शिवाजी ढाकणे, सुभाष खेडकर, यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना कराड म्हणाले, प्रशिक्षणातून शिक्षकांना मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष शैक्षणिक कार्यात उतरवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे. शिक्षक हा सक्षम ज्ञान समृद्ध व कर्तव्यदक्ष झाल्यास शैक्षणिक गुणवत्ता निश्चित उंचावणार आहे. शिक्षण देणारी व घेणारी या दोन पिढ्यांमध्ये ज्ञानाच्या पातळीवर समानता असावी या दृष्टीने शासनातर्फे देण्यात येणारी प्रशिक्षणे अत्यंत मोलाची ठरली आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये जिल्हा परिषद शाळांमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यामागचे हे सुद्धा एक कारण आहे. समाजासह सर्वच घटकांचा शिक्षकांवर विश्वास व श्रद्धा असल्याने जडणघडणीच्या कामांमध्ये शिक्षकांवर जबाबदारी टाकल्यास त्याची यशस्विता निश्चित होते. येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचे सुद्धा आव्हान सर्वच क्षेत्रांपुढे असून विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा सुद्धा मोठी झाली आहे. ज्ञानाची गती, अचूकता व परिणामकारकता याचा समन्वय साधण्यासाठी प्रशिक्षणे आवश्यक आहेत. असे कराड म्हणाले.

दहा दिवसांच्या कालावधीमध्ये विविध विषयांवरील तज्ञांची व्याख्याने चर्चासत्र संपन्न झाली सर्वच शिक्षकांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवत प्रशिक्षण पूर्ण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील खेडकर, सूत्रसंचालन आरिफ बेग, तर आभार डॉ. उद्धव घोशीर यांनी मानले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी संतोष घोगरे, राजेश साबळे, डॉ. धनगर, रामदास दहिफळे, प्रशांत शेळके, सुनील कटारिया व सर्व सुलभकांनी परिश्रम घेतले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

दखल

वैज्ञानिक संशोधन स्पर्धेत कृष्णा धोर्डे याचे सुयश

पुणतांबा : महाराष्ट्रातील नागपूर येथे २२ नोव्हेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावर संपन्न झालेल्या एनबीआर सीओम वैज्ञानिक संशोधन स्पर्धेत पोस्टर सादरीकरणात डोणगाव येथील कृष्णा प्रशांत धोर्डे यांनी द्वितीय पारितोषिक व एक लाख वीस हजार रुपयांचे बक्षीस मिळून घवघवीत यश संपादन केले. ह्या स्पर्धेत एकूण ४०० स्पर्धक सहभागी झाले होते. धोर्डे यांचे बी फार्मसी पर्यंतचे शिक्षण कोपरगाव येथील संजीवनी फार्मसी महाविद्यालयात तर उच्च शिक्षण नायपर हाजीपूर बिहार येथे पूर्ण झाले आहे. सध्या ते पंजाब मधील मोहली येथील नायपर फार्मसी महाविद्यालयात पीएचडीचे संशोधन करत आहे ते डोणगाव सोसायटीचे चेअरमन प्रवीण पंढरीनाथ धोर्डे यांचे पुतणे असून त्यांच्या यशाबद्दल पंचक्रोशीत त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

निधी देणाऱ्या पालकमंत्र्यांच्या नावाचे वावडे का ?- केतन खोरे

श्रीरामपूर : अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांनी दिलेल्या निधीतील श्रीरामपूर नगरपालिका हद्दीतील कामांचा शुभारंभ बोर्डवर विखे पाटलांच्या नावाचा उल्लेख का नाही? असा संतप्त सवाल मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांनी केला आहे. याबाबत बोलताना खोरे म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारकडून रस्ता अनुदान तसेच अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीमधून श्रीरामपूर नगरपालिकेला विविध विकास कामांसाठी निधी देण्यात आला आहे. या निधीतील काही विकास कामांचा शुभारंभ वॉर्ड नंबर २, ६, ७ मधील काही प्रभागांमध्ये नुकताच कांग्रेसच्या सत्ताधारी गटाने केला. सदर उद्घाटन बोर्डवर महायुती सरकारमध्ये ज्येष्ठ मंत्री असलेले व जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष असलेल्या पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांच्या नावाचा उल्लेख असणे गरजेचे होते. त्यासोबतच संबंधित प्रभागातील सर्व नगरसेवकांच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक होते. मात्र श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना त्याचा विसर पडलेला दिसतोय. नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी एकतर असे बोर्ड शहरात लावू नये आणि लावल्यास प्रोटोकॉल पाळावे, असे म्हटले आहे.

'कारखान्यावर दिसलात तर बापलेकांना मारून टाकीन'; शाळकरी मुलाला मारहाण

राहुरी : 'तू आणि तुझे वडील मला राहुरी कारखान्यावर दिसलात तर तुम्हाला मारूनच टाकतो,' अशी धमकी देत एका व्यक्तीने पाचवीत शिकणाऱ्या शाळकरी मुलाला शिवीगाळ करून लाकडी दांड्याने मारहाण केल्याची घटना राहुरी फॅक्टरी येथे घडली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात शुभम रमेश गाडे (रा. राहुरी कारखाना) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कल्याणी राजेंद्र गाढे (वय ३०, रा. कणगर, ता. राहुरी) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांचा मुलगा श्रेयश हा राहुरी फॅक्टरी येथील नूतन माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवीत शिकत आहे.

२० नोव्हेंबर रोजी सायंकाळी शाळा सुटल्यानंतर श्रेयश हा रामनगर येथे कणगरकडे जाणाऱ्या वाहनांची वाट पाहत उभा होता. त्यावेळी आरोपी शुभम गाडे हा दुचाकीवरून तेथे आला. त्याने श्रेयशला तू आणि तुझे वडील राहुरी कारखान्यावर दिसलात तर दोघांनाही मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर शिवीगाळ व दमदाटी करून लाकडी दांड्याने मारहाण केली. घरी आल्यानंतर श्रेयशने घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर कल्याणी गाढे यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी शुभम गाडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

नर्मदा परीक्रमेसाठी जाणाऱ्या भाविकांना

बेलापूर: येथील भाविक चार महिन्यांच्या पायी नर्मदा परीक्रमेसाठी ओंकारेश्वरला रवाना झाले. यावेळी ग्रामस्थांनी त्यांना भक्तीमय शुभेच्छा देत निरोप . बेलापूर गावातील शोभाशेठ लखोटीया, राजेंद्र राशींनकर, अशोक रोकडे,बाळासाहेब जाधव, बाबू वैद्य, विलास कुमावत, नारायण साबळे, सच्चीदानंद वाघमारे महाराज हे चार महिन्यांच्या पायी नर्मदा परीक्रमेसाठी रवाना झाले. या सर्वांना बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे, प्रतिथंयश व्यापारी दिनेश लखोटीया,तंटामुक्त समिती अध्यक्ष बाळासाहेब दाणी. पोलीस पाटील अशोक प्रधान आदिसह उपस्थित ग्रामस्थांनी निरोप देऊन शुभेच्छा दिल्या.



चारा नियोजनात राहता तालुक्याने राज्यासमोर आदर्श निर्माण करावा : पालकमंत्री विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



शिर्डी: राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई निवारणाबरोबरच पशुधनासाठी चारा नियोजनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. राहता तालुक्यात मोठ्या प्रमाणात पशुधन असून, त्याच्या संवर्धनासाठी उपलब्ध चारा, चारा उत्पादन आणि भविष्यातील गरज यांचे सूक्ष्म नियोजन करून तालुक्याने राज्यासमोर आदर्श निर्माण करावा, असे निर्देश पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

राहता येथे आयोजित तालुकास्तरीय टंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिर्डीच्या नगराध्यक्ष जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, अपर जिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधीर बोराळे, पशुसंवर्धन उपायुक्त उमेश पाटील आदी उपस्थित होते. तालुक्यातील पशुधनाची संख्या, शेतकऱ्यांकडील उपलब्ध चारा, चारा उत्पादन करणारे शेतकरी आणि भविष्यातील गरज यांची माहिती संकलित करून कृषी व पशुसंवर्धन विभागाने संयुक्त नियोजन करावे. उपलब्ध चाऱ्याचा साठा आणि उत्पादनाचा आढावा घेऊन उर्वरित चाऱ्याचे नियोजन करावे. हे काम जिल्ह्यासह राज्यासाठी पथदर्शी ठरावे, असे विखे यांनी सांगितले. बैठकीत पाणीपुरवठा योजना, जलजीवन मिशन, कालवे, सिंचन विहिरी, नाले व बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचा आढावा घेण्यात आला. गावांच्या पाणीपुरवठा योजनांची वीजजोडणी वीजबिलांमुळे खंडित करू नये. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरण व पाणीपुरवठा विभागाने समन्वय साधावा, असे निर्देशही त्यांनी दिले. विवाह सोहळ्यांवरील खर्च कमी करा टंचाईच्या काळात पाण्याचा काटकसरीने वापर करावा. विवाह सोहळे व उत्सवांवरील अनावश्यक खर्च टाळावा. विवाह समारंभातील उपस्थिती ५० पेक्षा अधिक नसावी, असे आवाहन विखे पाटील यांनी केले. बैठकीत विविध गावांतील नागरिकांनी पाणीपुरवठा, शेतीच्या आवर्तनासह प्रलंबित कामांबाबत समस्या मांडल्या. संबंधित विभागांनी त्यांची तातडीने दखल घेण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

'इंद्रधनुष्य २०२६' युवक महोत्सवात लोणीच्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

लोणी : राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सव 'इंद्रधनुष्य २०२६' मध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी येथील चार विद्यार्थ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या संघातून सहभाग नोंदवत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे १९ ते २३ नोव्हेंबरदरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नृत्य, संगीत, रंगमंचीय कला, ललित कला आणि वाङ्मयीन कला अशा विविध प्रकारांतील स्पर्धा घेण्यात आल्या. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या संघात विविध महाविद्यालयांतील ४५ गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये लोणीच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले. हिमाली नन्नावरे व प्रांजल शिंदे यांची लोकनृत्य प्रकारासाठी, ओंकार लोहार याची मुकनाट्य व एकांकिकेसाठी, तर वेदिका माने हिची लोकसंगीत, वाद्यवृंद, भारतीय समूहगान, शास्त्रीय गायन आणि नाट्यसंगीत या कलाप्रकारांसाठी निवड झाली होती. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्राजक्ता ब्राह्मणे यांचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील आणि कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.



संगमनेर–शिबलापूर–गुहा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी निधी द्या ; दादासाहेब पवार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : संगमनेर–शिबलापूर–गुहा राज्यमार्ग क्रमांक २६ वरील ४३.६ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व दर्जेदार डांबरीकरण करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब कुशाबापू पवार यांनी शासनाकडे केली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून डांबरीकरण उखडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. नगर–मनमाड आणि नाशिक–पुणे महामार्गांना जोडणारा पर्यायी मार्ग असल्याने या रस्त्याचे महत्त्व मोठे आहे. शेतकरी, दूध उत्पादक, व्यापारी व कृषिमाल वाहतूकदारांना रस्त्याच्या दुरवस्थेचा मोठा फटका बसत आहे. या कामाबाबत ८ डिसेंबर २०२३ रोजी चर्चा झाली होती. तसेच ११ डिसेंबर २०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावही सादर केला होता. मात्र, अद्याप मंजुरी व निधी मिळालेला नाही. रस्त्याचे तांत्रिक सर्वेक्षण करून रुंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण, साईट शोल्डर, पावसाच्या पाण्याचा निचरा आणि पुलांची दुरुस्ती करावी. कायमस्वरूपी काम सुरू होईपर्यंत खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी पवार यांनी केली आहे. अन्यथा आंदोलन, उपोषण आणि उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

शिबलापूर येथून कॉपर वायर चोरीला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आश्वी । संगमनेर तालुक्यातील शिबलापूर शिवारात असलेल्या अवादा सोलर प्लॅटमधून अज्ञात चोरट्यांनी तब्बल ३० हजार रुपये किमतीची ४०० मीटर लांबीची लाल कॉपर वायर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रविवारी (दि. २२) आश्वी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, रविवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शिबलापूर शिवारातील अवादा सोलर प्लॅटमध्ये प्रवेश करून तेथील ४०० मीटर लांबीची लाल रंगाची कॉपर वायर चोरून नेली.

या चोरीच्या घटनेमुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याप्रकरणी कंपनीचे सुरक्षा रक्षक सिध्दार्थ मुन्तोडे यांनी रविवारी आश्वी पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलिसांनी गुन्हा रजिस्टर नंबर २५४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा नोंदवला आहे. तर, या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल लहामगे हे करत आहेत.

औषधनिर्माणशास्त्राच्या शिक्षणाचा उपयोग मानवकल्याणासाठी करा : डॉ. सुस्मिता विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : औषधनिर्माणशास्त्राचे शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे माध्यम नसून समाजाच्या आरोग्याची सेवा करण्याचे प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाज व मानवकल्याणासाठी करून जबाबदार आणि कर्तव्यदक्ष औषधनिर्माणशास्त्रज्ञ म्हणून आपली ओळख निर्माण करावी, असे आवाहन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या परिसरात प्रथम वर्षातील नवागत विद्यार्थ्यांसाठी आयोजित स्वागत कार्यक्रमात डॉ.विखे पाटील बोलत होत्या. यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ तसेच पुणे येथील वेनोव्हेट जैवउपाययोजना कंपनीच्या संशोधन आणि विकास विभागाचे सहयोगी संचालक डॉ. संदीप सोनवणे,पायरेन्स आयबीएमएचे संचालक डॉ.मोहसिन तांबोळी,औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र जाधव, डॉ. राहुल गोडगे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अर्जुन आहेर, पी. व्ही. पी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप घोलप आदी प्रमुख उपस्थित होते.



यावेळी सहसचिव भारत घोगरे आणि डॉ. शिवानंद हिरेमठ यांनी विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्रातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी, औषधनिर्माणशास्त्र पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी आणि औषधनिर्माणशास्त्रातील वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांना 'शिक्षणरत्न पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल औषधनिर्माणशास्त्र, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि पायरेन्स परिसराच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी प्रवरा ग्रामीण औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल गोडगे यांनी आभार मानले.

राहुरी फॅक्टरीत आंतरराष्ट्रीय श्री महालक्ष्मी पूजा महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : परमपूज्य श्री माताजी निर्मला देवी यांच्या कृपाशीर्वादाने राहुरी फॅक्टरी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय श्री महालक्ष्मी पूजा महोत्सव, ध्यान शिबिर आणि सामूहिक सहज विवाह सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. देशभरातून तसेच इटली, रशिया, जर्मनी, दुबई यांसह विविध देशांतून सुमारे १२ ते १४ हजार सहजयोगी साधक या महोत्सवात सहभागी झाले होते. श्री माताजी निर्मला देवी यांच्या आजोळची भूमी म्हणून राहुरी तालुक्याला सहजयोगाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. श्री माताजींच्या मातोश्री श्रीमती कॉर्नेलिया सालवे यांचे माहेर राहुरी तालुक्यातील शिंगवे येथे आहे. तसेच आरडगाव येथील निर्मल धाम आश्रम आणि मुसळवाडी येथील एकादशी रुद्र स्वयंभू स्थान यामुळे या परिसराला आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परमपूज्य श्री माताजींनी १९७० मध्ये सहजयोगाची स्थापना करून जगभरातील १५० हून अधिक देशांमध्ये सहजयोगाचा प्रसार केला. याच परंपरेनुसार जगभरातील सहजयोगी दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने



एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. महोत्सवात 'सहज स्वर संध्या' या भजन संध्येसह हवन, ध्यानाची विविध सत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. युवक–युवतींचा सामूहिक सहज विवाह सोहळा पार पडला. त्यानंतर मुख्य आंतरराष्ट्रीय श्री महालक्ष्मी पूजा भक्तिभावाने संपन्न झाली. राष्ट्रीय ट्रस्टी अजित रणनवरे, राज्य समन्वयक विधिज्ञ महेश दांडेकर, राहुरी पूजा समिती सदस्य राम भवर, आबा वेताळ , डॉ.तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे, नगराध्यक्ष सत्यजित कदम, माजी सचिव शिवाजीराव बंगाळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

उबाठा शिवसेना ओबीसी विभागाच्या नेवासा तालुका प्रमुखपदी विजय वाघुले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील गोंडेगाव येथील निष्ठावंत शिवसैनिक विजय अण्णासाहेब वाघुले यांची उबाठा शिवसेना ओबीसी विभागाच्या नेवासा तालुका प्रमुखपदी गोंडेगाव येथील पैलवान विजय आण्णासाहेब वाघुले यांची नियुक्ती शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हा प्रमुख रामदासजी गोल्हार यांनी दिले आहे.

विजय वाघुले यांनी नेवासा तालुक्यातील गोंडेगाव येथे वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या दिवाळी फराळ व स्नेह मेळाव्याच्या प्रसंगी सदरचे नियुक्ती पत्र शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार व शिवसेना नेते अशोकराव थोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी झालेल्या फराळ व स्नेह मेळाव्याच्या प्रसंगी अहिल्यानगर जिल्हा बँकेचे संचालक कारभारी जावळे, पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे, शिवसेना नेते बाबासाहेब गोल्हार, डॉ. किशोर शेजूळ, अमोल गारुळे,बाबासाहेब रोडगे,रविंद्र निपुंगे,बापू राजे,दत्तूभाऊ काळे,नरेंद्र घोडेचोर,अनिल सुसे,प्रविण सुसे,ब्राम्हणे नाना यांच्यासह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



शिवसेना ओबीसी विभागाच्या तालुकाध्यक्षपदी विजय वाघुले यांच्या झालेल्या निवडीचे माजी मंत्री शंकरराव गडाख,जिल्हा बँकेचे संचालक कारभारी जावळे,शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार,शिव सहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण,बाबासाहेब गोल्हार, विभाग प्रमुख राजेंद्र राऊत,नारायण लष्करे यांनी अभिनंदन केले आहे.

भटके-विमुक्त समाजासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करा !

जिल्हाध्यक्ष प्रकाश पवार यांची मंत्री संजय राठोड यांच्याकडे निवेदनाडरे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : महाराष्ट्रातील भटके-विमुक्त जाती-जमातींसह गरीब, कष्टकरी आणि वंचित समाजातील कुटुंबांना हक्काचे घर, शिक्षण आणि रोजगाराच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने स्वतंत्र विशेष विकास आराखडा तयार करावा, अशी मागणी शिवसेना भटके-विमुक्त जाती-जमातीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश पवार यांनी राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे निवेदनाडरे केली आहे.

राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड हे अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर आले आहे जिल्हाधिकारी कार्यालयात शिवसेनेचे भटके विमुक्त जाती जमाती जिल्हाध्यक्ष प्रकाश पवार यांनी मंत्री राठोड यांची भेट घेऊन त्यांना दिलेल्या निवेदनात ते म्हटले आहे की महाराष्ट्रात आजही भटके-विमुक्त समाजातील अनेक कुटुंबांना स्वतः च्या हक्काचे घर नाही. कायम स्वरूपी राहण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने अस्थिर परिस्थितीत जीवन जगावे लागत आहे.आर्थिक अडचणीं मुळे मुलांना उच्च शिक्षण घेता येत नाही, तर दुसरीकडे रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्याने तरुणांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शासनाने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे पवार यांनी निवेदनात नमूद केले आहे.

मूलभूत सुविधांसह स्वतंत्र विकास निधीची मागणी

भटके-विमुक्त समाजाच्या वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, गटारे आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वृद्ध, विधवा आणि निराधार नागरिकांना नियमित आर्थिक मदत मिळावी, यासाठी प्रभावी व्यवस्था निर्माण करावी. जात प्रमाणपत्रासह विविध शासकीय कागदपत्रे मिळविताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करावे, अशी मागणीही प्रकाश पवार यांनी जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे.



भटके-विमुक्त समाजातील पात्र बेघर कुटुंबांना हक्काचे घर आणि जागा उपलब्ध करून द्यावी. समाजा तील विद्यार्थ्यांना शासनाने मोफत उच्च शिक्षणाची सुविधा द्यावी, तसेच प्रत्येक तालुक्यात मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करावीत. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण अर्धवट राहू नये, यासाठी शासनाने विशेष शैक्षणिक योजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगारा साठी बिनव्याजी कर्ज आणि अनुदान उपलब्ध करून द्यावे. महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक मदत देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी विशेष योजना राबवाव्यात, असेही निवेदनात म्हटले आहे.

तिसगाव वाडीतील मोठेबाबा देवस्थान यात्रेला आजपासून प्रारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोल्हार : राहाता तालुक्यातील तिसगाव वाडी येथील प्रसिद्ध मोठेबाबा देवस्थानच्या यात्रा उत्सवाला मंगळवार, दि. २४ नोव्हेंबरपासून प्रारंभ होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसह कुस्ती हंगाम्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती देवस्थानचे पुजारी सुनील कालेकर यांनी दिली.

मंगळवारी सकाळी सात वाजता गंगाजल पूजन, मोठेबाबांना अभिषेक, महापूजा व महाआरती होणार आहे. सायंकाळी साडेसात वाजता काठीची सवाद्य मिरवणूक, रात्री आठ वाजता शोभेचे दारूकाम



व अग्निहोम होईल. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजता एकरुखे येथील भागिनाथ वाघे व सहकाऱ्यांचा जागरण-गोंधळ आणि पोवाड्यांचा कार्यक्रम होणार आहे. बुधवारी दुपारी साडेचार वाजता कुस्ती हंगामा रंगणार आहे.

यात्रेनिमित्त मंदिराच्या कळसासह परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नुकताच मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून रंगरंगोटीही करण्यात आली आहे. मोठेबाबांना गोड भाताचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. भाविकांनी यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुजारी सुनील कालेकर, आबासाहेब रांधवणे व यात्रा समितीने केले आहे.

आ. आशुतोष काळेंची शिष्टाई फळाला

जवळके, धोंडेवाडी, बहादराबाद व शहापूरला मिळणार निळवंडेचे पाणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : निळवंडे कालव्याचे पाणी जवळके, धोंडेवाडी, बहादराबाद व शहापूर येथील बंधारे आणि पाझर तलावांपर्यंत पोहोचविण्याच्या मार्गातील अडचणी दूर करण्यात आमदार आशुतोष काळे यांना यश आले आहे. वितरिका क्रमांक ४ अर्थात मंगलमूर्ती लॉन्स येथे बसविण्यात आलेल्या व्हॉल्व्हच्या पाईपलाईनचे रखडलेले काम शेतकऱ्याची समजूत काढून मार्गी लावल्यामुळे चारही गावांना निळवंडेचे पाणी मिळण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे चारही गावांतील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

निळवंडे कालव्यातून जवळके, धोंडेवाडी, बहादराबाद व शहापूर येथील बंधारे आणि पाझर तलाव भरता यावेत, यासाठी मंगलमूर्ती लॉन्स येथे व्हॉल्व्ह बसविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. या मागणीची दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी निळवंडे कालव्याचे अधिकारी व शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. त्यानुसार वितरिका क्रमांक ४ वर मंगलमूर्ती लॉन्स येथे व्हॉल्व्ह बसविण्याचे काम पूर्ण झाले; मात्र त्यासाठी आवश्यक पाईपलाईन एका शेतकऱ्याच्या डाळिंबाच्या बागेतून टाकणे बाकी असल्याने पाणी पुढे नेण्याचे काम रखडले होते.

निळवंडे कालव्याला आवर्तन सुरू झाल्यानंतर पाच दिवसांपूर्वी आमदार आशुतोष काळे यांनी लाभक्षेत्रातील गावांचा दौरा करून पाणी वितरणाची परिस्थिती जाणून घेतली. यावेळी रांजणगाव देशमुख येथील डाळिंबाच्या बागेतून पाईपलाईन टाकण्याचे काम बाकी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित शेतकऱ्याची प्रत्यक्ष भेट घेतली. शेतकऱ्याच्या अडचणी समजून घेत त्याची समजूत काढली आणि उपस्थित शासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्याचे समाधान होईल असा मार्ग काढला. संबंधित शेतकऱ्यानेही मनाचा मोठेपणा दाखवत डाळिंबाच्या बागेतून पाईपलाईन टाकण्यास संमती दिली.

रोहितला न्याय मिळवून देण्यासाठी आठवले सरसावले; पठारे कुटुंबाची घेतली भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर, रोहित पठारे याला न्याय मिळवून देण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सोमवारी पठारे कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी कुटुंबीयांनी रोहितला न्याय मिळावा, अशी मागणी करत आठवले यांना निवेदन दिले. त्यांनी तत्काळ पोलीस अधीक्षकांशी फोनवर संपर्क साधून गुन्ह्याची माहिती घेतली. तसेच पठारे कुटुंबाची भूमिका मांडत प्रकरणात आवश्यक कलमांची वाढ करण्याबाबत सूचना केली.

भेटीदरम्यान आठवले यांनी कुटुंबीयांचे म्हणणे ऐकून घेतले. रोहितच्या मृत्यूला जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी कुटुंबीयांची मागणी होती. यावेळी त्यांनी पोलीस अधीक्षकांना कुटुंबीयांच्या तक्रारीची दखल घेऊन तपासाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास सांगितले.

दरम्यान, रोहितच्या पत्नी आणि भावाच्या रोजगाराचा प्रश्नही यावेळी उपस्थित झाला. समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन आठवले यांनी नोकरीबाबत चर्चा केली. रोहितच्या पत्नीचा नोकरीसाठीचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती यावेळी स्पष्ट झाली. त्यामुळे कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असल्याचे दिसून आले.

पठारे कुटुंबाला हक्काची जागा आणि घर उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली. यावेळी



नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी कुटुंबाला घर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे न्यायाच्या लढाईसोबतच कुटुंबाच्या पुनर्वसनाचा मुद्दाही चर्चेत आला.यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जर्हाड, तहसीलदार सुनील सावंत, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे तालुकाध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, बाजार समितीचे संचालक प्रशांत त्रिभुवन, बाबासाहेब पगारे, राजवीर त्रिभुवन, जाकीर पठाण आदी उपस्थित होते.

मराठी भाषा जतनासाठी प्रत्येकाने कंबर कसावी : डॉ. स्वाती महाळंक

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची कोपरगावात नांदी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव :मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून न राहता प्रत्येक मराठी भाषिकाने पुढाकार घेण्याची गरज आहे. मराठी भाषा टिकवायची असेल तर आपणच कंबर कसून उभे राहिले पाहिजे, असे आवाहन शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांनी केले.

जानेवारी २०२७ मध्ये पुणे येथे होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमंत्रणार्थ महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा कोपरगाव आणि कोपरगाव तालुका विद्यार्थी सहाय्यक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) एन.पी.पी. लॉ कॉलेज येथे नांदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये अध्यक्षस्थानी होते.

डॉ. स्वाती महाळंक यांनी साहित्य संमेलनाच्या इतिहासाचा आढावा घेतला. १८७८ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पुढाकारातून पुण्यात पहिली ग्रंथकार सभा झाली. पुढे या चळवळीचा विस्तार होत साहित्य संमेलनाची परंपरा निर्माण झाली. गेल्या वर्षी दहावीच्या परीक्षेत ८८ हजार विद्यार्थी मराठी विषयात नापास झाल्याची बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले. शंभराव्या संमेलनानिमित्त देशभरात ९९ नांदी संमेलने आयोजित करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी नांदी संमेलनांच्या माध्यमातून साहित्य चळवळ तालुकास्तरावर पोहोचत असल्याचे सांगितले. साहित्य संमेलने मूठभर लोकांपुरती मर्यादित असल्याची टीका दूर करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले.

यावेळी निबंध, वक्तृत्व आणि श्रीमद्भगवद्गीता पठण स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. हिरालाल महानुभाव यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकृष्ण वारुळे व भारती गरुड यांनी केले, तर अपर्णा चव्हाण यांनी आभार मानले. साहित्यप्रेमी, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



२०२७ च्या चातुर्मासासाठी साध्वी अनुप्रेक्षाजी म.सा. यांचे श्रीरामपूरला आगमन !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : सन २०२७ च्या चातुर्मासासाठी प.पू. महासाध्वी श्री अनुप्रेक्षाजी म.सा. आदि ठाणा–३ यांनी श्रीरामपूर श्री संघाची विनंती सहर्ष स्वीकारली आहे. त्यामुळे आगामी वर्षी श्रीरामपूर नगरीला साध्वी भगवंतांचे पावन सान्निध्य लाभणार असून जैन समाजात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सन २०२६ चा चातुर्मास प.पू. उपप्रवर्तिनी चंदनबालाजी म.सा. आणि प.पू. पद्मावतीजी म.सा. आदि ठाणा–७ यांच्या सान्निध्यात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. श्रीरामपूर स्थानक वासी संघाच्या धार्मिक कार्याची दखल घेत युवाचार्य प.पू. श्री महेंद्रऋषिजी म.सा.



यांनी २०२७ च्या चातुर्मासासाठी महासाध्वी अनुप्रेक्षाजी म.सा. यांना श्रीरामपूर येथे चातुर्मास करण्याची मंगल आज्ञा प्रदान केली. यानिमित्त रविवार, २२ नोव्हेंबर रोजी श्री स्थानकवासी जैन संघाच्या वतीने जेऊर येथे भव्य संघ यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे पाच वाजता श्रीरामपूर येथील जैन स्थानकातून धर्मप्रेमी बंधू-भगिनी मोठ्या श्रद्धेने यात्रेत सहभागी झाले. जेऊर येथे साध्वी भगवंतांचे दर्शन-वंदन करून आगामी चातुर्मासासाठी भावपूर्ण विनंती करण्यात आली. जिनशासन प्रभाविका महासाध्वी अनुप्रेक्षाजी म.सा., स्वाध्यायप्रेमी साध्वी श्रुतिप्रभाजी म.सा. आणि सेवाभावी साध्वी ऋजुप्रभाजी म.सा. यांनी ही विनंती स्वीकारली.

शिंगवे येथे २२०/३३ केव्ही वीज उपकेंद्राचा मार्ग मोकळा;

६.५५ हेक्टर जमीन देण्यास शासनाची मान्यता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : राहता तालुक्यातील शिंगवे येथे २२०/३३ केव्ही क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालकीची ६.५५ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यामुळे यश आले असून, महसूल विभागाने २३ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

शिंगवे येथील गट क्रमांक २८७ व २८४ मधील ही जमीन वीज उपकेंद्रासाठी उपलब्ध होणार आहे. प्रचलित बाजारमूल्य दरतक्त्यानुसार मूल्यांकनाची रक्कम शेती महामंडळाकडे जमा करण्याच्या अटीवर शासनाने जमीन प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. तसेच महामंडळाच्या संचालक मंडळाची कार्योत्तर मंजुरी घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या उपकेंद्रामुळे राहता व कोपरगाव या दोन तालुक्यांतील वीज वितरण आणि पारेषण यंत्रणा अधिक



सक्षम होण्यास मदत होणार आहे. वाढती विजेची मागणी, शेतीपंपांना वीजपुरवठा तसेच औद्योगिक क्षेत्राच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे उपकेंद्र महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शिर्डी-कोपरगाव औद्योगिक क्षेत्रालाही याचा लाभ मिळणार असून, शेतकरी, नागरिक आणि व्यावसायिकांना अधिक सक्षम वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि शेतकऱ्यांना दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हे आपले प्राधान्य आहे. शिंगवे उपकेंद्रासाठी जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे, अशी प्रतिक्रिया आमदार विवेक कोल्हे यांनी दिली. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री आणि राज्य शासनाचे आभार मानले.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार; दोघांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीला मध्यरात्री दुचाकीवरून निर्जन शेतवस्तीवर नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार वैजापूर तालुक्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी नितीन रोठे (रा. पालखेड) आणि विकास वाघ (रा. धोंदलगाव) या दोघांविरुद्ध वैजापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री एकच्या सुमारास नितीन रोठे याने मुलीच्या वडिलांच्या मोबाईलवर संपर्क साधून तिला वस्तीच्या रस्त्यावर बोलावले. मुलगी तेथे गेल्यानंतर नितीन रोठे आणि त्याचा मित्र विकास वाघ दुचाकीसह उपस्थित होते. मुलीने दुचाकीवर बसण्यास नकार दिला; मात्र दोघांनी तिला बळजबरीने दुचाकीवर बसवून दहेगावमार्गे धोंदलगावच्या पुढील शेतवस्तीवर नेले.तेथील घरात मुलीला नेल्यानंतर नितीन रोठे निघून गेला. विकास वाघ याने मुलीला घरी सोडण्यास नकार देत आरडाओरड केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दुसऱ्या दिवशी पहाटे सहाच्या सुमारास मुलीला पालखेड धरणाजवळील रस्त्यावर सोडून देण्यात आले. तेथून घरी पोहोचल्यानंतर तिने कुटुंबीयांना घडलेला प्रकार सांगितला.

दरम्यान, मुलीचे वडील आणि भाऊ नितीन रोठे याच्याकडे जाब विचारण्यासाठी गेले असता त्यांना जातिवाचक शिवीगाळ करण्यात आल्याची तक्रारही पोलिसांत देण्यात आली आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह पोक्सो आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार तसेच अपहरणासंबंधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

जलसंधारणाच्या ४.५० कोटींच्या कामांना मंजुरी द्या !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये जलसंधारणाची कामे होणे आवश्यक आहे. यासाठी साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती, नाला खोलीकरण व रुंदीकरण तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०२६-२७ च्या आराखड्यातील सुमारे ४ कोटी ५० लाख रुपयांच्या कामांना मंजुरी द्यावी, अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी जलसंधारणमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे. मंत्री संजय राठोड अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर आले असता आमदार काळे यांनी त्यांना निवेदन दिले. मतदारसंघातील साठवण बंधाऱ्यांची दुरुस्ती केल्यास पाणीसाठवण क्षमता वाढून शेती व सिंचनाला फायदा होणार आहे. तसेच नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण केल्यामुळे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले. प्रस्तावित कामांमध्ये शिंगणापूर, बहादराबाद, पोहेगाव, कोळपेवाडी, वारी, शहापूर, मनेगाव, काकडी आणि मोर्विस येथील साठवण बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचा समावेश आहे. याशिवाय रांजणगाव देशमुख, रवंदे, धोत्रे, वेस, मल्हारवाडी, डांगेवाडी, बहादरपूर आणि पोहेगाव परिसरातील नाला खोलीकरण, रुंदीकरण व साठवण बंधाऱ्यांची कामे प्रस्तावित आहेत.



माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१२८	६८०
१३	४६
२२९	३६७

dpbosssss.live
Mydpboss.com

सोनई गावात डुकरांचा सुळसुळाट, कारवाई करण्याची ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई : नेवासा तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेले सोनई येथे डुकरांनी उच्चांक मांडला असून त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. गावात ८ ते १० हजार डुकरे झाली असून त्या मुळे रोगराई वाढली आहे. गावात मागील आठवड्यात डेंग्यूचे ही काही पेशंट सापडले आहेत. डुकरे मोकाट रस्त्याने पळतात त्या मुले अनेक अपघात झाले आहेत. मागील आठवड्यात सोनई येथे लकी ड्रायक्लीनाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ग्रामस्थ शरद काळे पाटील यांनी आपली व्यथा मांडली. जिल्हा परिषद चे अर्थ व बांधकाम समितीचे माजी चेअरमन सुनील गडाख व मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदय गडाख यांच्या कानावर हा उपद्रव घालणार असून लवकरच या डुकरांचा योग्य तो बंदोबस्त करण्याची मागणी काळे यांनी केली आहे.

दरम्यान डुकरांचा लवकरच बंदोबस्त केला जाईल अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. काळे यांनी ग्रामसेवक तथा प्रशासक यांना लेखी पत्र देऊन कारवाई करण्यासंदर्भात विनंती केली आहे. येत्या आठ दिवसात कुठलीच कारवाई न केल्यास ग्रामसेवक यांच्या विरोधात त्यांच्या वरिष्ठाकडे तक्रार केली जाईल असे निवेदनात म्हटले आहे.

जिल्ह्यातील १४ तालुक्यांत निकृष्ट गणवेश ; अहवाल दडविणाऱ्या दोषींना अभय का ?

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : गोरगरीब विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी शासनाचा निधी खर्च होत असताना अहिल्यानगर जिल्ह्यात विद्यार्थ्यांच्या अंगावर निकृष्ट दर्जाचे गणवेश पोहोचल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. प्रयोगशाळेच्या तपासणीत अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये गणवेशाच्या गुणवत्तेबाबत त्रुटी आढळल्याचा दावा केला जात असताना, १३ तालुक्यांचे तपासणी अहवाल अद्याप जिल्हा परिषदेकडे जमा झाले नसल्याची माहिती समोर येत आहे. मग हे अहवाल कुठे अडकले? निकृष्ट गणवेश विद्यार्थ्यांना पुरविणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? गुणवत्ता तपासणीच्या नावाखाली नेमके काय चालले आहे? असे संतप्त सवाल पालकवर्गातून उपस्थित होत आहेत.

राहुरी तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी विद्यार्थ्यांकडील प्रत्यक्ष वापरातील गणवेशाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीस पाठविल्यानंतर गणवेशाच्या गुणवत्तेतील त्रुटी समोर आल्या. नऊ पुरवठादारांपैकी आठ पुरवठादारांचे गणवेश गुणवत्ता तपासणीत अपात्र ठरल्याची बाब समोर आली. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेश तपासल्यामुळे निकृष्ट दर्जाचे वास्तव उघड झाले. राहुरीत ही तपासणी होऊ शकते, तर जिल्ह्यातील अन्य तालुक्यांत अशी तपासणी का झाली नाही? १३ तालुक्यांचे अहवाल जिल्हा परिषदेकडे अद्याप का जमा झाले नाहीत? गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या भूमिकेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गणवेशाच्या गुणवत्तेची तपासणी करून अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित गटशिक्षणाधिकारी यांची असताना अहवालच जिल्हा परिषदेकडे जमा होत नसल्याने संशय अधिक गडद होत आहे. गुणवत्ता तपासणी समाधानकारक झाली होती की निकृष्ट गणवेश स्वीकारण्यासाठी कागदोपत्री सोपस्कार पूर्ण करण्यात आले? मुख्याध्यापक,पुरवठादार व्यापारी, केंद्रप्रमुख आणि संबंधित शाळा व्यवस्थापन समिती यांच्यातील जबाबदारी नेमकी कुणाची? या सर्व बाबींची सखोल चौकशी होण्याची गरज आहे.

निकृष्ट गणवेश स्वीकारण्यामागे आर्थिक हितसंबंध किंवा कमिशनचे व्यवहार झाले का,मुख्याध्यापक व काही केंद्रप्रमुख अथवा संबंधितांनी पुरवठादारांकडून आर्थिक लाभ घेतल्याच्या चर्चा पालकवर्गातून होत आहेत. हे आरोप अद्याप सिद्ध झालेले नसले तरी गणवेशाच्या गुणवत्तेतील त्रुटी आणि तपासणी अहवाल सादर करण्यातील विलंब यामुळे संशयाला खतपाणी मिळत आहे.

या चर्चांची निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची आहे. गोरगरीब विद्यार्थ्यांच्या हक्काच्या गणवेशात गुणवत्तेशी तडजोड करणाऱ्यांना अभय मिळणार की कारवाईचा बडगा उगारला जाणार? १३ तालुक्यांचे अहवाल जिल्हा परिषदेकडे जमा न होण्यामागचे गौडबंगाल उघड होणार का? आता जिल्हा परिषद प्रशासनाच्या भूमिकेकडे संपूर्ण शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

पहिला गणवेशच नव्हे, दुसऱ्याचीही प्रयोगशाळेत तपासणी करा!

विद्यार्थ्यांना पहिला गणवेश पुरविल्यानंतर दुसऱ्या गणवेशाचाही पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ पहिल्या गणवेशाची तपासणी करून थांबू नये. विद्यार्थ्यांकडील पहिल्या आणि दुसऱ्या गणवेशाचे प्रत्यक्ष नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी. कागदोपत्री तपासणी करून निकृष्ट गणवेश स्वीकारणाऱ्या मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि शाळा व्यवस्थापन समित्यांची जबाबदारी निश्चित करावी. विद्यार्थ्यांच्या हक्काच्या गणवेशात गुणवत्तेशी तडजोड करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे.

सीईओ आनंद भंडारी कठोर भूमिका घेणार का?

जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये निकृष्ट गणवेशाचा पुरवठा झाल्याचे अहवालातून समोर येत असल्याचा दावा, १३ तालुक्यांचे तपासणी अहवाल अद्याप जिल्हा परिषदेकडे जमा नसणे आणि राहुरीत आठ पुरवठादार गुणवत्ता तपासणीत अपात्र ठरणे, या सर्व बाबी गंभीर आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी तातडीने सर्व तालुक्यांचे गणवेश तपासणी अहवाल मागवावेत, विद्यार्थ्यांकडील पहिल्या व दुसऱ्या गणवेशाचे नमुने प्रयोगशाळेत तपासावेत आणि निकृष्ट गणवेश स्वीकारणाऱ्या संबंधित व्यापारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समित्यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे.

सर्व शाळांतील गणवेशाचे नमुने पुन्हा तपासा!

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या वापरातील गणवेशाचे नमुने पुन्हा संकलित करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत. यापूर्वी कागदोपत्री गुणवत्ता तपासणी करणाऱ्या यंत्रणेवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष नमुन्यांची स्वतंत्र तपासणी करावी. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार निकृष्ट गणवेश पुरवठा करणारे व्यापारी, गणवेश स्वीकारणारे मुख्याध्यापक आणि तपासणीची जबाबदारी असलेले केंद्रप्रमुख यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

निधनवार्ता

विजया शेवाळे



नेवासा : मालेगाव येथील गं.भा. विजया पंडितराव शेवाळे (वय ८५ वर्षे) यांचे रविवार दि.२२ नोव्हेंबर रोजी निधन झाले.

त्यांचे मागे दोन मुले, दोन मुली, सुना,नातवंडे असा परिवार आहे.भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे व मालेगाव येथील नामांकित डॉ. सुनील शेवाळे यांच्या त्या मातोश्री होत्या.

लताबाई कोकणे



टाकळीभान: येथील शेतकरी कुटुंबातील लताबाई बाबासाहेब कोकणे वय (५८ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे, भाऊ, भाऊजाई,जावई,पुतणे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी बाबासाहेब कोकणे यांच्या त्या पत्नी ,तर रमेश कोकणे यांच्या त्या मातोश्री होत.

सुशिला सुर्यवंशी



श्रीरामपूर : येथील वॉर्ड नं. ६, कांदा मार्केट परिसरातील सुशिला मच्छिंद्र सुर्यवंशी (वय ७०) यांचे रविवार, दि. २२ रोजी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी मच्छिंद्र रामभाऊ सुर्यवंशी यांच्या पत्नी, सुनिल व सतिश सुर्यवंशी यांच्या मातोश्री होत.

मच्छिंद्र लोणारी



सोनई : नेवासा तालुक्यातील पानसवाडी येथील रहिवासी मच्छिंद्र दामोदर लोणारी (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पुतणे ,पाच मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. आकाश लोणारी व भास्कर लोणारी यांचे ते वडील होत.

सुलोचना धुमाळ



श्रीरामपूर, येथील मेनरोड, राम मंदिर चौकातील गं. भा. सुलोचना केरबा धुमाळ (वय १००) यांचे रविवार, दि. २२ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्व. सुलोचना धुमाळ या जेष्ठ स्वातंत्रसेनानी स्व. केरबा भिकाजी धुमाळ यांच्या पत्नी व मधुकर व अनिल धुमाळ यांच्या मातोश्री तसेच बाजारतळ येथील योगेश लोह उद्योग समुहाचे मालक प्रशांत, योगेश व सुमित धुमाळ यांच्या त्या आजी होत.

मिराबाई शिंदे



श्रीरामपूर : (वार्ताहर) येथील इंदिरानगर परिसरात वास्तव्यास असलेल्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका मिराबाई पोपटराव शिंदे (वय ८२) यांचे सोमवार, दि. २३ रोजी अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दिर, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त शिक्षक पोपट श्रीपती शिंदे यांच्या पत्नी, श्रीरामपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन शिंदे व डॉ. मुकुंद शिंदे यांच्या मातोश्री, डॉ. मनिषा शिंदे व डॉ. आरती शिंदे यांच्या सासूबाई होत.

पाणीप्रश्नावर राष्ट्रवादीचा हंडा मोर्चा; महिलांचा नगरपंचायतीसमोर ठिय्या

मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : पारनेर शहरातील अनियमित पाणीपुरवठा, दूषित पाणी आणि बंद पथदिव्यांच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पारनेर शहर शाखेच्या वतीने सोमवारी (दि. २३) नगरपंचायतीवर धडक हंडा मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात शहरातील असंख्य महिला हातात हंडे घेऊन नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या देत बसल्या होत्या. महिलांनी पाणीप्रश्नाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाचे लक्ष वेधले. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

शहरात तब्बल १२-१२ दिवसांनंतर पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चार लाख लिटर पाणी मंजूर असतानाही प्रत्यक्षात केवळ दीड लाख लिटर पाणी मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. काही भागांत दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असून वाडी-वस्त्यांवरील पाणीटंचाईही कायम आहे. याशिवाय अनेक भागांतील पथदिवे बंद असल्याने विशेषतः बिबट्याचा वावर असलेल्या परिसरात नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या आंदोलनात राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वसंत चेडे, नगरसेवक पै. युवराज पठारे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले, महिला तालुकाप्रमुख सुषमाताई रावडे, शंकर नगरे, अशोक चेडे, सहदेव कुलट, कांतीलाल ठाणगे, कविता औटी, अपर्णा खामकर, करण औटी, कल्याण थोरात, सुभाष औटी, ज्ञानेश्वर औटी, विठ्ठल कावरे, शकुंतला ठाणगे, शिवाजी जाधव, नियाज राजे, भाऊ औटी यांच्यासह कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रशासनाने पाणीप्रश्न गांभीर्याने घ्यावा : पै. युवराज पठारे

पारनेर शहरातील नागरिकांना पाण्यासाठी १२-१२ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. मंजूर पाणी आणि प्रत्यक्ष मिळणारे पाणी यातील तफावत दूर करून प्रशासनाने तातडीने योग्य नियोजन करावे. अन्यथा नागरिकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

महिलांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी संघर्ष सुरूच ठेवणार : सुनिताताई सोबले

शहरातील महिलांना पाण्यासाठी दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. दूषित पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून महिलांचा संयम आता संपला आहे. हंडा घेऊन नगरपंचायतीसमोर बसण्याची वेळ महिलांवर येणे ही दुर्दैवी बाब आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून महिलांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन सुरूच राहील.

द•ख•ल

दिल्लीच्या कुस्ती मैदानात अजनुजच्या तेजस्विनीची सुवर्णभरारी!

श्रीगोंदा : जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील मुलीही राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, याचा प्रत्यय श्रीगोंदा तालुक्यातील अजनुज गावची कन्या कु. तेजस्विनी श्रीधर गिरमकर हिने दिला आहे. दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत तेजस्विनीने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिच्या या दैदिप्यमान यशाने अजनुज गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तेजस्विनी ही श्रीगोंडा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कै. ज्ञानदेव साहेबराव गिरमकर यांची नात, तर श्रीधर (काका) ज्ञानदेव गिरमकर यांची कन्या आहे. कुस्तीच्या मैदानात तिने मिळवलेले हे यश तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि सातत्यपूर्ण सरावाचे फलित आहे. तेजस्विनीच्या कुस्तीतील वाटचालीत वस्ताद हनुमंत फंड यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तसेच हरियाणा येथील प्रसिद्ध कुस्ती प्रशिक्षक सत्पाळ सिंग यांच्याकडूनही तिला मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले आहे. कुस्तीची परंपरा आणि शिस्त जपणाऱ्या या मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली तेजस्विनीने राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे आणि त्यात सुवर्णपदक मिळवणे ही मोठी अभिमानाची बाब आहे. ग्रामीण भागातील मुलींनीही क्रीडा क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनतीची तयारी ठेवावी, असा प्रेरणादायी संदेश तेजस्विनीच्या यशातून मिळत आहे.



अवैध धंद्यांविरोधात एलसीबीचा जिल्हाभर धडाका!

श्रीगोंदा : अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा एकदा धडक मोहीम उघडली आहे. जिल्ह्यात एकाच दिवशी नऊ ठिकाणी छापे टाकत अवैध दारू विक्री आणि जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल २ लाख २४ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, विविध पोलीस ठाण्यांत नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पाच पथके तयार करून जिल्ह्यातील अवैध व्यावसायिकांवर कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार २२ नोव्हेंबर रोजी या पथकांनी विविध ठिकाणी छापे टाकले. या मोहिमेत पारनेर येथे अवैध दारूविक्रीचा एक, कोतवाली येथे दारूविक्रीचा एक आणि जुगाराचा एक, पाथर्डी येथे दारूविक्रीचे तीन, श्रीगोंदा येथे दारूविक्रीचा एक, तर श्रीरामपूर शहरात दारूविक्रीचा एक आणि जुगाराचा एक असे एकूण नऊ गुन्हे दाखल झाले. विशेष म्हणजे श्रीरामपूर शहरातील जुगार कारवाईत सर्वाधिक १ लाख ८१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्या तुलनेत श्रीगोंदा तालुक्यातील कारवाईत केवळ १ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त झाल्याची नोंद आहे. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखालील पथकांनी ही कारवाई केली. जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधातील ही मोहीम यापुढेही सुरू राहणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ग्रामीण आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणार : आ. राजळे

शेवगाव : ग्रामीण रुग्णालय बोधेगाव व ग्रामीण रुग्णालय शेवगाव येथील रुग्ण कल्याण समिती व तंत्र-सल्लागार समितीची बैठक सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी शेवगांव पंचायत समिती सभागृहात पार पडली. या बैठकीस आ. मोनिका राजळे, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, सोनाली म्हात्रे, तहसीलदार आकाश दहाडदे, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, ग्रामीण रुग्णालय शेवगावच्या अधीक्षक डॉ. दर्शना धोंडे, ग्रामीण रुग्णालय बोधेगावचे अधीक्षक डॉ. श्रीकांत मोराळे, सा.बा. उपअभियंता प्रल्हाद पाठक, तसेच समितीचे अशासकीय सदस्य मंदाकिनी मुरकुटे, प्रसाद पवार, डॉ. गीता, निरज लांडे, गणेश रांधवणे, राहुल सावंत, सचिन वारकड, बाळासाहेब खरात, जयश्री खंडागळे, बापू धनवडे, अमोल माने, उषा कंगनकर, अनिल वडागळे उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक डॉ. दर्शना धोंडे व डॉ. श्रीकांत मोराळे यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रामीण रुग्णालयांमार्फत रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांची माहिती दिली. यावेळी बोलताना आ. मोनिकाताई राजळे यांनी रुग्ण कल्याण समितीच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. डॉक्टरांनी नोकरी म्हणून नव्हे, तर रुग्णसेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडावे. रुग्णांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी डॉक्टरांनी रुग्णालयात जास्तीत जास्त वेळ देऊन वेळेचे बंधन व शिस्त पाळावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. बदलत्या जीवनशैलीमुळे आजारांचे स्वरूप बदलत असून, तरुण वयातही हृदयविकाराचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे..

भक्तीचा जागर, गोदावरीच्या स्वच्छतेचा ध्यास..!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : अध्यात्म म्हणजे केवळ ईश्वरभक्ती नव्हे, तर समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि निसर्गाप्रती असलेली कृतज्ञताही होय. याच विचाराला कृतीची जोड देत सद्गुरू श्री जोग महाराज संस्थान आखेगावचे मठाधिपती ह.भ.प. श्रीराम महाराज झिंजुर्के यांच्या संकल्पनेतून श्रीक्षेत्र पैठण येथे गोदावरी नदीपात्र आणि घाट स्वच्छतेचा अनोखा आध्यात्मिक-सामाजिक उपक्रम सुरू आहे. या उपक्रमातून आजवर ४०० टनांहून अधिक ओला कचरा उचलण्यात आला असून मोठ्या प्रमाणात सुका कचराही विल्हेवाट लावून हटविण्यात आला आहे.

चैत्र शुद्ध एकादशी २०२३ पासून सुरू झालेला हा स्वच्छतेचा संकल्प आज ४४ वाऱ्या पूर्ण होईपर्यंत अखंडितपणे सुरू आहे. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध एकादशीला शेवगाव, पाथर्डी, नेवासा आणि पैठण तालुक्यांतील चार ते पाच गावे या सेवाकार्यात सहभागी होतात. प्रत्येक एकादशीला दुपारी दोन ते सहा या वेळेत गोदावरी नदीपात्र आणि घाटाची स्वच्छता केली जाते. प्रत्येक वेळी साधारणतः नऊ ते दहा टन कचरा उचलला जातो. यामध्ये पाच ते सहा ट्रॅक्टर ओला कचरा नगरपरिषदेच्या कचरा डेपोमध्ये टाकला जातो. एका ट्रॅक्टरमधून सुमारे दोन टन कचऱ्याची वाहतूक केली जाते. मोठ्या प्रमाणातील सुक्या कचऱ्याचीही त्याच ठिकाणी विल्हेवाट लावली जाते.

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पैठणला आध्यात्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे. याच पवित्र भूमीत श्री संत एकनाथ महाराज यांनी जलसमाधी घेतली. अशा पवित्र गोदावरीचे पात्र स्वच्छ आणि निर्मळ राहावे, या भावनेतून श्रीराम महाराज झिंजुर्के यांनी हा संकल्प हाती घेतला. भक्तीच्या मार्गावर चालताना नदीमातेची सेवा हीच ईश्वरसेवा मानून शेकडो हात या कार्यासाठी एकत्र येत आहेत.

स्वच्छतेनंतर ध्वजारोहण आणि गंगापूजन केले जाते. शेकडो टाळकऱ्यांच्या उपस्थितीत गोदावरीच्या वाळवंटात फडकरी पद्धतीचे कीर्तन रंगते. या कार्यक्रमाला हजारो भाविक उपस्थित राहतात. सहभागी गावांकडून भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाते. एकादशीच्या दिवशी कीर्तनानंतर रात्री जागर आणि पहाटे काकडा आरती व भजनाने या आध्यात्मिक सोहळ्याची सांगता होते.

या उपक्रमात सद्गुरू जोग महाराज संस्कार केंद्र आखेगाव, वै. नारायण बाबा झिंजुर्के भक्ती प्रतिष्ठान सोमठाणे न., भक्ती शक्ती केंद्र देवटाकळी, वै. विठ्ठल महाराज घुले भक्ती केंद्र सुसरे, सद्गुरू काशिनाथ बाबा भक्तीपीठ वडुले, सद्गुरू यादव बाबा भक्तीपीठ वरूर, श्रीमद् भागवत शताब्दी प्रासादिक मंडळ भातकुडगाव, भक्तराज सेवा मंडळ बेलगाव, सद्गुरू श्री जोग महाराज शताब्दी प्रासादिक मंडळ कोरडे वस्ती शेवगाव, सद्गुरू भीमसिंह महाराज भक्तीपीठ बालमटाकळी यांच्यासह अनेक गावांनी मोठा सहभाग नोंदवला आहे.

गोदावरीच्या पात्रातील कचरा हटविण्याबरोबरच मनामनातील सेवाभाव जागविण्याचे काम या उपक्रमातून होत आहे.

प्रल्हाद कर्तने यांच्या उपोषणाला पाठिंबा खरवंडी कासारमध्ये उत्स्फूर्त बंद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



खरवंडी कासार : भगवानगड परिसरातील गावांना पाणी मिळावे, दुष्काळी प्रश्न मार्गी लागावेत तसेच जलजीवन मिशनअंतर्गत रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण व्हावीत, या मागण्यांसाठी प्रल्हाद कर्तने यांचे आमरण उपोषण सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून अद्याप उपोषणाची ठोस दखल घेतली जात नसल्याने खरवंडी कासार येथे नागरिकांनी बंदचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत खरवंडी कासारमध्ये उत्स्फूर्त बंद पाळण्यात आला.यावेळी अशोक गोल्हार पांडूरंग खेडकर लहू दराडे महादेव दराडे नितीन कीर्तने भास्करराव पाटील (अंदुरे) विष्णू ढाकणे रमेश अंदुरे सुभाष केकाण भगवानगड परिसरातील नागरिकांनी एकत्र येत गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ (छक-६१) वर रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रल्हाद कर्तने यांच्या उपोषणाची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी आणि परिसरातील पाणीटंचाई व इतर समस्यांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे. भगवानगड परिसरातील तब्बल ४६ गावांमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची कामे अनेक ठिकाणी अर्धवट अवस्थेत बंद पडली आहेत. त्यामुळे नागरिकांना अद्याप नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळण्याचा प्रश्न कायम आहे. ही रखडलेली कामे तातडीने सुरू करून विहित मुदतीत पूर्ण करावीत, जेणेकरून प्रत्येक गावातील नागरिकांना घरापर्यंत नळाद्वारे पाणी उपलब्ध होईल, अशी मागणी करण्यात आली आहे.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगवर गुलमोहर चॅलेंजर्सचे निर्विवाद वर्चस्व

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : मैदानावरील आक्रमक खेळ, गोल करण्यासाठी खेळाडूंमध्ये सुरू असलेली चढाओढ आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद अशा फुटबॉलमय वातावरणात रंगलेल्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वावर गुलमोहर चॅलेंजर्स संघाने विजेतेपदाची मोहोर उमटविली. अंतिम सामन्यात एक्सलन्स अचिव्हर्स आणि गुलमोहर चॅलेंजर्स यांच्यात अटीतटीची लढत झाली. निर्धारित वेळेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक गोल केल्याने सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेल्या टायब्रेकरमध्ये अचूक गोल करत गुलमोहर चॅलेंजर्सने विजेतेपद पटकाविले. एक्सलन्स अचिव्हर्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. नगर क्लबच्या मैदानावर नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेतला होता. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत सकाळपासून रात्री उशिरापर्यंत सामने रंगले. खेळाडूंच्या वेगवान चाली, अचूक पासिंग, आक्रमक चढाया आणि गोलरक्षणाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे मैदानावर फुटबॉलचा थरार अनुभवायला मिळाला. फुटबॉलप्रेमी, पालक आणि क्रीडारसिकांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

२०० कोटींच्या शिरूर-श्रीगोंदा रस्त्याचे काम निकृष्ट

ठेकेदार-अभियंत्यांची 'अर्थपूर्ण सांगड'वर संताप; आ. पाचपुते यांच्या हस्तक्षेपाची मागणी!

सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री



बेलवंडी : सुमारे दोनशे कोटी रुपयांच्या निधीतून सुरू असलेल्या शिरूर ते श्रीगोंदा रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि काही ठिकाणी आवश्यक मशिनरीविना सुरू असल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याचे काम चालू असून, अद्याप रस्त्यावरील सर्व पूल अपूर्णच आहेत. त्यातच ठेकेदार आणि संबंधित अभियंता यांच्यात 'अर्थपूर्ण सांगड' असल्याची जोरदार चर्चा रंगली असून, अभियंत्यांच्या सोयीस्कर दुर्लक्षामुळे कामाच्या दर्जाचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

त्यामुळे आता आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी यामध्ये लक्ष घालण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

काम पूर्ण होण्यापूर्वीच अनेक ठिकाणी रस्ता खचला आहे, काही ठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरणाचे सिमेंट उडून गेले आहे, तर काही भागांत रस्त्याला भेगा पडल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. काँक्रिटीकरणाच्या कामात योग्य मशिनरीचा अभाव आणि तांत्रिक नियमांची पायमल्ली होत असतानाही अभियंते डोळेझाक करत असल्याची भावना प्रवाशांमध्ये आहे.

या संथ आणि दर्जाहीन कामामुळे ऊस वाहतूकदारांना मोठी कसरत करावी लागत असून, रात्री-अपरात्री प्रवास करताना सर्वसामान्य प्रवाशांच्या जीवाशी धोका निर्माण झाला आहे.

ठेकेदाराच्या मनमानी कारभाराकडे आणि अभियंत्यांच्या दुर्लक्षाकडे श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी आग्रही मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

लोकप्रतिनिधींनी या प्रकरणात हस्तक्षेप करून ठेकेदार व अभियंत्यांची चौकशी करावी, रखडलेली पुलांची कामे लवकर मार्गी लावावीत आणि रस्त्याचे काम दर्जेदार व सुरक्षित करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

आता श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यावर काय भूमिका घेणार याकडे श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

जेऊरच्या दोन्ही चौकांत अपघातांचा धोका; रेड सिग्नल बसविण्याची मागणी!

ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला ; वारंवार अपघात होऊनही प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर येथील महावितरण कंपनीचा चौक आणि जेऊर मुख्य चौक अपघातांचे केंद्र बनत आहेत. महामार्गावरून भरधाव वेगाने धावणारी वाहने आणि दोन्ही चौकांतील वाढती वर्दळ यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या दोन्ही चौकांमध्ये रेड सिग्नल यंत्रणा बसविण्यासह आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि पालक वर्गातून जोर धरत आहे.

महावितरण कंपनीच्या चौकातून बहिरवाडी, कोल्हार, चापेवाडी आणि डोंगरगणकडे जाणाऱ्या नागरिकांची तसेच विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. या चौकात पांढरे पट्टे मारण्यात आले असले तरी भरधाव वाहनांमुळे रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागते.

दुसरीकडे जेऊर मुख्य चौकातून जेऊर गाव, ससेवाडी आणि डोंगरगणकडे जाणाऱ्या नागरिकांची व विद्यार्थ्यांचीही मोठी ये-जा सुरू असते.

दोन्ही चौकांमध्ये दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. चौकांनी वारंवार लहान-मोठे अपघात घडत आहेत. या चौकांमध्ये झालेल्या अपघातांत अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला असून काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. तरीही ठोस उपाययोजना होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



